**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २८ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूनं पी एम ई ड्राईव्ह योजनेच्या निकषांमध्ये बदल.**
2. **उद्या पासून नागपूरात अखिल भारतीय पोलिस ड्युटी मीट 2025-26 चे आयोजन.**
3. **यंदाच्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेला आजपासून प्रारंभ.**
4. **अमरावती जिल्हा सलग दुसऱ्या दिवशी ठरला विदर्भा सर्वात उष्ण, ४१.२ अंशसेल्सियस इतक्या तापमानाची नोंद.**

पीएमई ड्राईव्ह

विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूनं आणलेल्या पीएमई ड्राईव्ह योजनेच्या निकषांमधे केंद्रसरकारने बदल केला आहे. आता ३१ जुलै २०२६ पर्यंत नोंदणी झालेल्या दुचाकी आणि ३१ मार्च पर्यंत नोंदणी झालेल्या इलेक्ट्रिक रिक्षा आणि ढकलगाड्यांना 'ही' प्रोत्साहनपर सूट मिळेल. प्रोत्साहन मिळण्यासाठी दुचाकींची कमाल किंमत मर्यादा दीड लाख रुपये तर रिक्षांची कमाल किंमत मर्यादा अडीच लाख इतकी ठेवण्यात आली आहे.

मालाची वाहतूक

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मानवतवादी मदत सुलभतेने आणि वेगाने पोहोचवण्यासाठी इराणने सहमती दर्शवली आहे. जागतिक पुरवठा साखळीत ही सामुद्रधुनी महत्त्वाचा मार्ग असून तिथं मानवतावादी मदत आणि कृषी मालाची वाहतूक करू देण्याची संयुक्त राष्ट्रांची विनंती तेहरानने स्वीकारली आहे. संयुक्त राष्ट्रांमधे इराणचे राजदूत अली बहरेनी यांनी ही माहिती दिली. इराणच्या अणुउर्जा प्रकल्पांवर हल्ले होत असतानाही ही विनंती मान्य केल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान भारताची दोन तेलवाहू जहाजं आज होर्मुझची सामुद्रधुनी पार करणार आहेत. भारतीय नौदलाच्या युद्धनौका त्यांच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आल्या आहेत.

छगन भुजबळ

महाराष्ट्रात पाईपद्वारे नैसर्गिक वायू (PNG) पुरवठा नेटवर्कचा विस्तार वेगाने करण्यासाठी केंद्राने तांत्रिक व आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली. नवी दिल्लीतील बैठकीत त्यांनी पीएनजी विस्तारातील अडचणी मांडत 'डीम्ड परमिशन' तत्त्व लागू केल्याची माहिती दिली. नवीन गृहनिर्माण प्रकल्पांसाठी पीएनजी जोडणी अनिवार्य करण्याचाही प्रस्ताव त्यांनी मांडला. बैठकीला केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर आणि हरदीप सिंग पुरी यांच्यासह विविध राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मन की बात'

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३२ वा भाग असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

भारतीय पोलिस ड्युटी मीट

नागपूर येथे 29 मार्च ते 3 एप्रिल दरम्यान अखिल भारतीय पोलिस ड्युटी मीट 2025-26 च आयोजन करण्यात आल आहे. CID Additional General of Police सुनील रामानंद यांनी दिलेल्या माहितीनुसार, या स्पर्धेत देशभरातील 29 पथके, 935 पोलिस कर्मचारी आणि 152 डॉग स्क्वॉड सहभागी होणार आहेत. या मीटमध्ये संगणक जागरूकता, डॉग स्क्वॉड, व्हिडिओग्राफी, अँटी-सब्बोटाज तपासणी, वैज्ञानिक तपास पद्धती आणि फोटोग्राफी यांसारख्या स्पर्धा होणार असून एकूण 63 पदके आणि 17 ट्रॉफी देण्यात येणार आहेत. उद्घाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून समारोप सोहळ्यास गृह राज्य मंत्री नित्यानंद राय उपस्थित राहणार आहेत. या बद्दल नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी सविस्तर माहिती दिली आहे-

ई-गव्हर्नन्स

राज्य सरकारच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा तसेच सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत आज सर्वोत्तम जिल्हाधिकारी आणि सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशस्तिपत्रांचे वितरण केले. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संबंधित अधिकाऱ्यांना प्रशस्तिपत्रांचे वितरण करण्यात आले. सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून विनायक महामुनी - नागपूर यांचा देखील त्यात समावेश आहे.

इंडियन प्रीमियर लीग

१९ वी इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आजपासून सुरु होत आहे. संध्याकाळी बंगळुरू इथं उद्घाटनाचा सामना एम. चिन्नास्वामी मैदानावर 'सनरायझर्स हैदराबाद' आणि गतविजेते 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' या संघांमध्ये होणार आहे. गेल्या वर्षी बंगळुरूमधेच आयपीएलच्या विजय सोहळ्याच्या वेळी क्रिकेटशौकिनांच्या गर्दीत चेंगराचेंगरी झाल्यानं ११ जणांचा मृत्यू झाला होता. त्यांच्याप्रति संवेदना व्यक्त करण्याच्या उद्देशाने यंदा प्रथेनुसार उद्घाटन सोहळा होणार नाही असं बीसीसीआयने जाहीर केलं आहे. या ११ जणांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी प्रेक्षागृहातली ११ आसनं पूर्ण स्पर्धेसाठी रिकामी ठेवण्यात येतील. सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. मुंबईच्या वानखेडे मैदानावर उद्या मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स यांची लढत होईल. प्रसिद्ध क्रिकेटपटू महेंद्रसिंह धोनी सध्या पोटरीच्या स्नायूंच्या दुखापतीवर उपचार घेत आहे. त्यामुळे आजपासून सुरु होणाऱ्या टाटा आयपीएल स्पर्धेत पहिले दोन आठवडे तो खेळू शकणार नाही, अशी शक्यता ‘चेन्नई सुपर किंग्स’ कडून व्यक्त करण्यात आली आहे.

वॉकिंग ट्रॅक

मध्य नागपूरचे आमदार प्रवीण दटके आणि आयुक्त डॉ. विपीन यांनी शनिवारी गांधीसागर तलाव आणि उद्यान परिसराची संयुक्त पाहणी केली. यावेळी गणेश मंदिर ते एम्प्रेस मॉलदरम्यान वॉकिंग ट्रॅकचे काम लवकर सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. तलाव परिसरातील उर्वरित कामे, फाऊंटन, लाईट शो आणि खाऊगल्ली विकसित करण्यावरही भर देण्यात आला. पाहणीदरम्यान स्थानिक नागरिकांनी मान्यवरांचे स्वागत केले.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

जगात इराण, इस्रायल आणि अमेरिकेमधील तणाव वाढत असताना, चंद्रपुरात जगाच्या शांततेसाठी अनोखा उपक्रम राबवण्यात आला. सोमय्या ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशनच्या १३०० विद्यार्थ्यांनी ‘मानवी शांतता चिन्ह’ साकारत गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केली. यापूर्वीचा १०७० विद्यार्थ्यांचा विक्रम मोडीत काढण्यात आला. गिनीज प्रतिनिधींनी संचालक पांडुरंग आंबटकर यांना प्रमाणपत्र प्रदान केले.

चर्चासत्र

गडचिरोली येथे ‘महाराष्ट्रातील आदिवासी साहित्य’ या विषयावरील चर्चासत्राचे उद्घाटन प्रा.सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी साहित्यात तळागाळातील लोकांच्या वेदना व वास्तव जीवनाचे प्रतिबिंब उमटणे आवश्यक

असल्याचे सांगितले. केवळ ललित साहित्य नव्हे, तर संकटांवरही लेखन व्हावे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला साहित्य अकादमी व दंडकारण्य संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

हवामान

विदर्भातील अमरावती जिल्हा आज सतत दुसऱ्या दिवशी 41.2 अंश सेल्सिअस इतक्या तापमानासह सर्वात उष्ण ठरला आहे. अमरावती प्रमाणेच अकोला आणि वर्धा इथं तपमान 41 अंश सेल्सिअसच्या घरात आहे, तर नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यामध्ये 40.6 अंश सेल्सिअस आणि वाशिम जिल्ह्यात 40 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, येत्या सोमवारी ३० मार्च रोजी अमरावती, अकोला, गडचिरोली आणि नागपूर जिल्ह्यात मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा आणि पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या दरम्यान अमरावती जिल्ह्यात गारपीट देखील होऊ शकते असा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

यवतमाळ महोत्सव

राज्य शासनाच्या विविध जिल्हास्तरीय विभागांमार्फत आयोजित पाच दिवसीय 'यवतमाळ महोत्सवा'त जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्हा माहिती कार्यलयामार्फत 'लोककल्याणकारी शासकीय योजनांचे आणि सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रदर्शनीत जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत लोककल्याणकारी योजना व सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना प्रदर्शित करण्यात आल्या आहे. या प्रदर्शनीच्या माध्यमातून नागरिकांनी शासनाच्या योजनांची माहिती मिळवून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री राठोड यांनी यावेळी केले.

वाघ हल्ला

भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यात उमरझरी येथे वाघाच्या हल्ल्यात एक महिला गंभीर जखमी झाली. ६० वर्षीय महिला मिरची तोडत असताना दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला केला, मात्र त्यांच्या पतीच्या प्रसंगावधानामुळे वाघ पळून गेला. जखमी महिलेला प्रथम साकोली उपजिल्हा रुग्णालयात आणि नंतर भंडारा जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. आठवडाभरातील ही दुसरी घटना असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

एनसीईआरटी

युजीसी अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगाची २०२६ची जातविषयक समानता नियमावली तसंच एनसीईआरटी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या पाठ्यपुस्तकातल्या एका प्रकरणावरून झालेले वाद टाळण्याजोगे होते, असं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे.वाद मांडण्याच्या पद्धतींवरही त्यांनी खेद व्यक्त केला.नियमावलीत कोणावरही भेदभाव किंवा अन्याय होणार नाही याची काळजी सरकार नक्कीच घेईल,असं त्यांनी सांगितलं.

******